**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २४ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज संध्याकाळी बोलावली सर्वपक्षीय बैठक.**
2. **महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.**
3. **राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त गोंदिया जिल्ह्यातील डव्वा ग्रामपंचायत पुरस्कृत.**
4. **विदर्भात उन्हाची तीव्रता कायम, आज नागपूरसह अनेक जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट.**

---------------------------------------

**सर्वपक्षीय बैठक**

**पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज संध्याकाळी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.संरक्षणमंत्री राजनाथ सिंह विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना हल्ल्या संदर्भातील माहिती तसंच या हल्ल्यानंतर सरकारने पाकिस्तानविरुद्ध जी पावलं उचलली आहेत त्याची माहिती देणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. दरम्यान, जम्मू काश्मीरमधल्या ठिकठिकाणी राज्य पोलीस दल आणि सुरक्षादलांनी संयुक्त शोधमोहिमा तीव्र केल्या आहेत.उधमपूर जिल्ह्यात आज सुरक्षा बलाचे सैनिक आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत एका सैनिकाला वीरमरण आलं. डुडु वसंतगड क्षेत्रात सुरक्षा दल राबवत असलेल्या शोधमोहिमेदरम्यान ही चकमक झाली.**

---------------------------------------

**पर्यटकांची पहिली तुकडी**

**जम्मू कश्मीर मध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातल्या पर्यटकांची पहिली तुकडी विशेष विमानाने आज पहाटे साडेतीन वाजता मुंबई विमानतळावर सुखरूप पोहचली. शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचं गुलाबपुष्प देऊन स्वागत केलं. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी**

पडलेल्या महाराष्ट्रातील हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांवर काल रात्री डोंबिवलीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तिघांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं.पुण्याचे कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे तसंच नवी मुंबईचे दिलीप दिसले या पर्यटकांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव शरीर आज पहाटे पुण्यात आणण्यात आलं. पनवेलमधील दिलीप दिसले यांच्या पार्थिव देहावर काल पनवेल मध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

-----------------------------------

पंचायती राज दिन

देशाचा विकास गावखेड्यांच्या विकासातून साकार होतो, या महात्मा गांधींच्या संकल्पनेवर पंचायती राज योजना राबवण्यात येत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहारमध्ये मधुबनी इथे पंचायती राज दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. गेल्या दशकात पंचायतींना बळकट करण्यासाठी पावलं उचलण्यात आली आहेत. २ लाखांहून अधिक ग्रामपंचायती इंटरनेटने जोडल्या गेल्या त्यामुळे अनेक आवश्यक कागदपत्रं मिळणं सुलभ झालं. स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांनंतर ३० हजार नवीन पंचायत भवन इमारती बनवल्या गेल्या. तसंच दहा वर्षांत २ लाख कोटींहून अधिक निधी पंचायतींना मिळाला आहे असंही मोदी यावेळी म्हणाले. यावेळी मोदी यांच्या हस्ते १३ हजार ५०० कोटी रुपये खर्चाच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्धाटन आणि लोकार्पण करण्यात आलं. पहलगाम इथल्या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना प्रधानमंत्र्यांनी काही क्षण मौन पाळून आदरांजली वाहिली. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी भारताच्या आत्म्यावर हल्ला करण्याचे धाडस केले आहे. ज्यांनी या हल्ल्याचा कट रचला त्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल असे मोदी यावेळी म्हणाले -

*मैं बहुत स्पष्ट शब्दों में कहना चाहता हूँ जिन्होंने ये हमला किया है उन आतंकियों को और इस हमले की साजिश रचने वालों को उनकी कल्पना से भी बड़ी सजा मिलेंगे। सजा मिलकर के रहेंगी। अब आतंकियों की बची खुची जमीन को भी मिट्टी में मिलाने का समय आ गया है। एक सौ चालीस करोड़ भारतीयों की इच्छाशक्ति अब आतंकियों की कमर तोड़कर रहेंगी।*

-----------------------------------

ग्रामपंचायत डव्वा

दरम्यान, हवामान बदलाचे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा ग्रामपंचायतीनं राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२३-२४ अंतर्गत देशातून प्रथम पटकाविला असून एक कोटी पुरस्काराची मानकरी ठरली आहे. घरोघरी सौर ऊर्जेचा वापर करणे, प्लास्टिक बंदी, फटाके बंदी अश्या उपाय योजना ग्राम पंचायत ने केल्या असून सरपंच योगेश्वरी चौधरी यांनी अधिक माहिती दिली आहे -

*तीन थीम आणि तीन थीममधून आम्ही कार्बन न्यूट्रलमध्ये जो स्पेशल पुरस्कार होता. त्याच्यात पार्टिसिपेट केलं. गावामध्ये जे कुटुंब आहेत, वयक्तिक त्या कुटुंबामध्ये जास्तीत जास्त सोलरच्या प्रचार करणे, दुसरा जसे सार्वजनिक इमारती, सार्वजनिक इमारतीमध्ये आमच्या गावात एकोणवीस इमारतीमध्ये सोलरवर ते चालतात. ग्रामपंचायत सुद्धा सोलरवर चालते. इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन जर असेल तर जास्तीत जास्त लोक त्याच्याकडे वळतील आणि म्हणून आणि इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर बसवला तो सुद्धा आमचा सोलरवर आहे.*

-----------------------------------

पोलाद उद्योग

भारताचा पोलाद उद्योग हा नव्या आत्मविश्वासाने त्याच्या भविष्याकडे बघत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मुंबईत बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या इंडिया स्टील २०२५ च्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने केलं, त्या वेळी ते बोलत होते. राष्ट्रीय पोलाद धोरणांतर्गत निर्धारित केलेल्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांवर त्यांनी यावेळी प्रकाश टाकला. येत्या २०३० पर्यंत देशातलं पोलाद उत्पादन ३० कोटी टनांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्यांचही ते यावेळी म्हणाले. तीन दिवसांच्या या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत जागतिक पोलाद मूल्य साखळीतील आघाडीचे देश एकत्र येऊन, भविष्यातल्या वाटचालीवर चर्चा करणार आहेत.

-----------------------------------

हवामान

नागपूरसह, चंद्रपूर, वर्धा अमरावती या सर्व जिल्ह्यांमध्ये आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून उद्या नागपूर चंद्रपूर अमरावती आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जरी करण्यात आला आहे. दरम्यान, विदर्भातच चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक 45 पूर्णांक पाच अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली तर अकोला इथं 45 अंश सेल्सिअस वर्धा इथं 44.7, अमरावती आणि गडचिरोली येथे 44.6 आणि नागपुर इथं 44.4 इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 40 ते 43 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. स्थानिक प्रशासनातर्फे उष्माघात प्रतिबंधक उपाय योजना करण्यात आली असून पिण्याच्या पाण्याचे प्याऊ, चौकात हिरवे नेट, दवाखान्यांमध्ये उष्माघात विभाग अशी सज्जता ठेवण्यात आली आहे.

-----------------------------------

आयपीएल

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरूमधे रायल चॅलेंजर्स बंगलोर आणि राजस्थान रॉयल्स दरम्यान सामना होणार आहे. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

-----------------------------------

QR कोड

नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्यासाठी भंडारा जिल्ह्यातील साकोली भूमि अभिलेख कार्यालयाने जिल्हा सूचना केंद्र भंडारा यांच्या सहकार्याने नवीन QR कोड आणि संकेतस्थळ विकसित केले आहे. या उपक्रमाचे लोकार्पण जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.या नव्या सुविधेमुळे नागरिकांना घरबसल्या कार्यालयाशी संबंधित तक्रारी नोंदवता येणार आहेत, तसेच प्रलंबित कामांबाबत माहिती मिळविणेही शक्य होणार आहे.

-----------------------------------

आयआयएमसी

अमरावतीच्या भारतीय जन संचार संस्थान -आयआयएमसी- मध्ये मराठी पत्रकारिता डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता प्रवेशासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३० मे २०२५ असून प्रवेश अर्ज आयआयएमसीच्या अमरावती कार्यालयात येऊन भरता

**येईल. इच्छुक उमेदवारांना प्रवेश प्रक्रिया संबंधी अधिक माहिती अधिकृत वेबसाइट https://iimc.gov.in/language-courses-25-26 वर मिळेल.**

**-----------------------------------**

**सत्याग्रह आंदोलन**

**राष्ट्रीय पंचायतराज दिनानिमित्त यवतमाळ इथं आज काँग्रेसने सत्याग्रह आंदोलन केलं. नागरिकांना आर्थिक सामाजिक न्याय देणारी लोकशाही व्यवस्था जगायला हवी. मात्र शासनाने गेल्या तीन ते पाच वर्षं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतलेल्या नाहीत. त्यामुळे निर्णयप्रक्रियेत सामान्य माणसांचा सहभाग नगण्य होत चाललेला आहे अशी भूमिका या आंदोलनामागे असल्याचं माजी मंत्री वसंत पुरके यांनी यावेळी सांगितलं.**

**-----------------------------------**